# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक १७.०७.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १६.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १० केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून ६४,३९०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून १,८३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३८० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ३,२३,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस. तीन वाहनचोरीचे गुन्ह्यातील पाहीजे आरोपीस अटक.**

दिनांक १६.०७.२०२६ चे १०.५० वा. चे सुमारास, वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे वाहन चोरीचे गुन्हयातील आरोपींचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, वाहन चोरीचे गुन्हयातील पाहिजे आरोपी फैजान अंसारी हा फिक्कट जांभळया रंगाची फुलबाहीची टि—शर्ट व पांढरा पॅन्ट घातलेला असून, एका चोरीचे पांढरे रंगाचे ॲक्टिवा मोपेडने वाडी बायपास रोडवर फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, परिसरात शोध घेतला असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम हा एका मोपेड गाडीवर संशयीतरित्या दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव फैजान तनविर अंसारी मुश्ताक अहमद अंसारी, वय २४ वर्षे, रा. मदीना मस्जीद जवळ, माजरी, यशोधरानगर, नागपुर असे सांगीतले. त्याचे ताब्यातील पांढऱ्या रंगाचे मोपेड क्र. एमएच. ४९ पि ९६५६ बाबत विचारणा केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्याचेवर संशय बळावला. त्यास गुन्हेशाखा कार्यालय येथे आणुन, वाहनाबाबत शहानिशा केली असता, नमुद मोपेडचा क्रमांक हा बनावट असल्याचे व मुळ क्रमांक हा एमएच ४९ एक्यु. ५४३० असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद वाहन हे पो. ठाणे तहसिल हद्दीतुन चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो पो. ठाणे मानकापुर, कोराडी व नविन कामठी हद्दीत घडलेल्या वाहन चोरीचे गुन्ह्यात पाहीजे आरोपी असल्याचेही दिसुन आले. आरोपीचे ताब्यातुन पांढऱ्या रंगाची मोपेड क्र.एमएच ४९ एक्यु. ५४३० किंमती ५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला

आहे. आरोपीकडुन पो.ठाणे तहसिल येथे दाखल ०१ वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी तहसिल पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. सारंग मिराशी, पोहवा. रोशन तिवारी, अजय शुक्ला, नितीन वर्मा, पंकज हेडाऊ व चापोअं. अभय ढोणे यांनी केली.




**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ पोलीसांची कामगिरी :— देहव्यावसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १६.०७.२०२६ चे १९.०५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे सदर हद्दीत, छावनी चौक अचरज टॉवर बिल्डींग येथील तळमजल्यावरील रेडीयंट सलुन ॲण्ड स्पा नावाचे दुकानात रेड कार्यवाही केली असता, तेथे त्यांना आरोपी ईसम नामे भुषण नरेशराव वाघमारे, वय ३१ वर्षे, रा. अंबाझरी अजय नगर, गुल्लर दवाखान्याजवळ, सुधाकर ढोकणेचे घरी किरायाने, अंबाझरी, नागपुर हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून, पिडीत मुलींकडुन देहव्यावसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०३ पिडीत मुलीची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख ३,०००/—रू., एक मोबाईल फोन, डिव्हीआर व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे ३६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीचे विरूध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम १४३(२)(३) भा.न्या.सं., सहकलम ३, ४, ५, ७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाई कामी सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे व त्यांचे पथकाने केली.




**४) सदर पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १७.०७.२०२६ चे ०२.०० वा. ते ०२.१० वा. चे सुमारास, सदर पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे हद्दीत, बुटी कंपाऊंड माऊंट रोड येथील 'डाऊन टाऊन हुक्का पार्लर' नावाचे कॅफे येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली. तेथे कॅफे मालक आरोपी क्र. १) गौरव श्रीराम बोकडे, वय ३३ वर्ष, रा. प्लॉट नं. ७, ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, अजनी, नागपूर हा वेटर आरोपी क्र. २) परेश मदन सोरते, वय १९ वर्ष, रा. निकालस मंदीर जवळ, लकडगंज, नागपुर याचे सहाय्याने ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का, स्मार्ट कंपनीच्या टिव्ही ०२ नग, स्पिकर बॉक्स ०२ नग, डिव्हीआर व ईतर साहित्य असा एकुण १,५८,८००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेमालक, वेटर व ०७ ग्राहक असे एकूण ०९ आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम २७२ भा.न्या.सं सहकलम ४(अ),२१(अ) सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम—२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम—२०१८.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उपायुक्त (परि.क्र. ०२), मा. श्री. सत्यविर बंडीवार सहा. पोलीस आयुक्त (अती. कार्य. सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर, दुपोनि. पवन भिंगारदिवे, पोउपनि. निकेतन किल्लेदार, पोहवा. निलेश लोंदे, अमित चेके, आशिष बहाळ, संदीप शेळके व पोअं. पंकज तिवारी यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे लकडगंज :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १७.०७.२०२६ चे ०१.३४ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना फवारा चौक येथे एक ईसम संशयीतरित्या आढळुन आल्याने त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव जोशु उर्फ जॉर्डन चंद्रेश सोनटक्के, वय १९ वर्षे रा. उमंग कॉलेज मागे, पांजरा, सावनेर रोड, कोराडी, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन संशयीतरित्या वावरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोहवा. उमाकांत नागदेवे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. प्रशांत सरकटे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे हिंगणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १६.०७.२०२६ चे ११.३० वा. चे सुमारास, फिर्यादीची मुलगी नामे कु. वंशीका राजकुमार गुरडकर, वय २३ वर्षे, रा. रेल्वे कॉर्टर जवळ, सुरेश काककुरे यांचे घरी किरायाने, बुट्टीबोरी, नागपूर ही तीचे मित्रासह त्याचे मोटारसायकल क्र. एमएच ४० डि.डी. ३६९५ ने पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत समृध्दी हायवे रोडने सालईदाभा गावाजवळील पुलाचे खालुन जात असतांना, आरोपी टिप्पर ट्रक क्र. एमएच ४० सिएम ९४६० चा चालक नामे शेख निसार शेख रफिक वय ३१ वर्षे, रा. नागराज कॉलोनी, वार्ड क्र. ०६, जुन्नारदेव, जि. छिंदवाड (मध्यप्रदेश) याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीची मुलगी बसुन जात असलेल्या मोटारसाकलला मागुन धडक दिली. अपघातामध्ये मोटारसायकल स्वार दोघेही खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलीस तपासुन मृत घोषीत केले. इतर जखमींचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी श्रीमती मंगला राजकुमार बुरडकर, वय ३५ वर्ष, रा. रेल्वे कॉर्टर जवळ, सुरेश काककुरे यांचे घरी किरायाने, बुट्टीबोरी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोहवा. गजानन पवार ९५१८३५६२८६ यांनी आरोपी टिप्पर ट्रक चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१),१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे ईमामवाडा</u> :—** दिनांक १६.०७.२०२६ चे १५.०० वा. चे पुर्वी, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत, बारा सिग्नल गल्ली नं. १, शितला माता मंदीर जवळ राहणारे इसम नामे रोहीत दिपक अरखेल, वय २८ वर्षे यांनी राहते घरी कोणीही हजर नसतांना, कोणत्यातरी अज्ञात कारणावरून, रूमचे छताचे लोखंडी हुकला साडीचे सहाय्याने गळफास घेतला. नातेवाईकांनी त्यांना खाली उतरवुन उपचारकामी मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. धनराज काकडे ९८२३२२०२५६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**